REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १३ एप्रिल, १९४९ अंक १५

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

४, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
(लेः—. रेवि ॲले, किं. २ रु.)

दी

**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,७६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :


(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ-वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें



## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचे प्रभाकर कंदील, स्टोव्हज, एनॅमलॅच्या थाळया वगैरे भांडीं, स्टेनलेस स्टीलचीं एव्हरसिल्व्हर भांडीं.

| केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक. |
|---|---|

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १००-वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**ब्रिटिश मोटारींची आयात**—१९४८ सालांत हिंदनें ब्रिटनकडून १२,९२१ मोटारी आणि टॅक्सी आयात केल्या. ह्याशिवाय व्यापाराला उपयोगीं पडण्यासारख्या ३,५७४ मोटार गाड्याही आयात करण्यांत आल्या. ह्याच वर्षी पाकिस्ताननें १,१२९ मोटारी आणि २८७ व्यापारोपयोगी मोटार गाड्या आयात केल्या.

**मासे टिकविण्यासाठी शीतगृह**—मुंबईला ससून डॉकसमध्यें मासे टिकविण्यासाठी एक शीतगृह बांधण्याचें काम सध्या चालू आहे. हें गृह मध्यवर्ती सरकार प्रयोगादाखल बांधीत असून त्यांत ५०० टन मासे टिकविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. शीतगृहासाठी ५ लाख रुपये खर्च येईल.

**पूर्व पाकिस्तानांत कोळसा सांपडला**—सिल्हेट जिल्ह्यांत माधवपूर नजीक दगडी कोळशाच्या खाणी सांपडल्याची वार्ता आहे. कोळसा सांपडल्याचा हा प्रदेश ४ मैल विस्तृत असून त्यांत जमिनीखालीं ६ ते १० फूट खोलीवर कोळसा आहे असें आढळून आलें आहे.

**दंग्यांविरुद्ध विम्याचें संरक्षण**—मुंबई कॉर्पोरेशनच्या बेस्ट वीज आणि वहातुक कंपनीनें दंग्या-धोप्यांत होणारी मालमत्तेची नुकसानी भरून काढण्यासाठीं एक फंड काढण्याचें ठरविलें आहे. दरवर्षी कंपनीला जो नफा होईल त्यांतून हा फंड उभारण्यांत येणार आहे. सध्या अशा प्रकारच्या जोखमेची जबाबदारी एका विमा कंपनीनें अंगावर घेतलेली आहे.

**शेतीच्या उत्पन्नावरील कर**—शेतीच्या उत्पन्नावर कर घेण्याचें मद्रास सरकारनें तूर्त रद्द केलें आहे, असें समजतें. चलन वृद्धीवरील एक उपाय म्हणून हा नवीन प्राप्तीवरील कर बसविण्याची सूचना मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारांना दिलेली होती.

**तामीळ कवीची संभावना**—तामिळ वाङ्मयांत महत्त्वाची भर घालणारे दिवंगत कवि श्री. भारती ह्यांच्या विधवा पत्नीला आणि दोन मुलींना प्रत्येकीं ५,००० रुपये देण्याचा हुकूम मद्रास सरकारनें काढला आहे.

**मद्रास प्रांतांतील जाहिरातीवरील कर**—मद्रास प्रांतांत वृत्तपत्रांतील जाहिरातीवर घेण्यांत यावयाचा कर, जाहिरातींच्या बिलाच्या १० टक्के असणार आहे. ह्या करामुळें प्रांताच्या खजिन्यांत सालिना २० ते ३० लाख रुपये गोळा होतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**मध्यप्रांतांत प्रौढ शिक्षणाची मोहीम**—मध्यप्रांतांत चालू वर्षीच्या उन्हाळ्यांत प्रौढांना शिक्षण देण्यासाठी ५०० कॅम्प्स उघडण्यांत येणार आहेत. १ मे पासून ह्या केंद्रांतून शिक्षण देण्यास प्रारंभ होऊन तीं ५ आठवडेपर्यंत चालविण्यांत येतील. प्रत्येक २० प्रौढांसाठी एक स्वयंसेवक, ह्याप्रमाणें स्त्री आणि पुरुष स्वयंसेवकांची भरती करण्यास प्रारंभ झाला आहे.

**उत्पादनवाढीसाठी कामगारांच्या सूचना**—अमेरिकेंतील वेस्टिंगहौस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशनच्या कामगारांनीं १९४८ मध्यें उत्पादन वाढविण्यासाठी ११,४०४ कल्पना सुचविल्या. ह्या सुचनांपैकीं ५,००० सूचना प्रत्यक्ष अंमलांत आणल्या गेल्या आणि त्याबद्दल सर्व कामगारांना मिळून ५६,२०९ डॉलर्स बक्षीस देण्यांत आले. एका कामगारानें अभ्रकाचे पत्रे यंत्राच्या साह्यानें कसे करावे ह्यासंबंधीं फक्त १७ शब्दांत एक सूचना केली होती. त्याबद्दल त्याला ५,०८५ डॉलर्स बक्षीस देण्यांत आले. कामगारांकडून सूचना मागविण्याची पद्धत कंपनीनें सुरू केल्यापासूनच्या ३९ वर्षांत एकाच कामगाराला दिलेल्या रकमांत ही सर्वांत मोठी आहे. कामगारांकडून आलेल्या सूचनांचा उत्पादन वाढविण्यासाठी चांगलाच उपयोग होत असल्याचें आढळून आल्यानें आतां विमान-कंपन्या, बँका आणि विमा कंपन्या ह्यांचे चालकही ह्या पद्धतीचा उपयोग करूं लागले आहेत.

**काच सामानाच्या धंद्याचें संरक्षण**— काच सामानाच्या कारखान्यांना संरक्षण अगर इतर प्रकारची मदत देण्यासंबंधींचा प्रश्न हिंद सरकारनें चौकशी करण्यासाठीं टॅरीफ बोर्डाकडे सोंपविला आहे. काच सामानाच्या धंद्यांत बांगड्यांच्या धंद्याचाहि समावेश होतो. निरनिराळ्या प्रकारचें काचेचें सामान तयार करणाऱ्या कारखान्यांकडून माहिती गोळा करण्याच्या दृष्टीनें टॅरीफ बोर्डानें एक प्रश्नावलि तयार केली असून ती सेक्रेटरी, इंडिअन टॅरीफ बोर्ड ह्यांच्याकडून ह्या धंद्यांशीं संबंध असणाऱ्यांना मिळूं शकेल.

**आंतरराष्ट्रीय मदत व पुनर्घटना संस्था**— गेल्या महायुद्धांत उध्वस्त झालेल्या देशांना मदत करून, त्यांना त्यांच्या पायावर उभें करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेनें एक मदतीची संस्था १९४३ च्या नोव्हेंबरांत स्थापन केली होती. ह्या संस्थेंत ४८ राष्ट्रांनीं भाग घेतला होता. युरोप आणि आशिआंतील देशांना मिळून ह्या संस्थेनें सुमारें ४,००,००,००,००० इतकी डॉलर्स रक्कम प्रारंभापासून खर्च केली. आतां ही संस्था बंद करण्यांत आली आहे. संस्थेतर्फे अल्बानिया, ऑस्ट्रिया, चीन, झेकोस्लोव्हाकिआ, फिनलंड, हंगेरी, इटली, कोरिआ, पोलंड इत्यादि देशांना मदत करण्यांत आली.

**मुंबईला रेडिओचा नवा कारखाना**—मुंबईला येत्या ऑक्टोबरपासून रेडिओ बनविण्याचा एक नवा कारखाना उभारण्यांत येणार आहे. लंडनजवळील वेलविन गार्डन सिटी ह्या कंपनीकडून रेडिओचे भाग घेऊन त्यांची जुळणी मुंबईला करण्यांत येणार आहे. ह्या नवीन कंपनीचें नांव मर्फी रेडिओ ऑफ इंडिया लि. असें ठेवण्यांत येणार आहे. सध्या लंडनमधील कंपनीप्रमाणेंच रेडिओ बनविण्यांत येणार आहेत. परंतु बाजारपेठेचा अंदाज लागल्यावर साधे व स्वस्त रेडिओ बनविण्याचा कंपनीचा मुख्य उद्देश आहे.

**पाकिस्तानसाठी परकीय तंत्रज्ञ**—पाकिस्तान सरकारकडे नोकरी मिळविण्यासाठी अनेक देशांच्या तज्ज्ञांनीं अर्ज केले आहेत असें समजतें. ह्या देशांच्या यादींत इंग्लंड, हॉलंड, डेनमार्क, कॅनडा, तुर्कस्थान, ब्रम्हदेश, ऑस्ट्रेलिआ व अमेरिका हे देश आहेत. धातु गाळण्यांतील तज्ज्ञ, यांत्रिक आणि रसायनशास्त्राचे तज्ज्ञ इत्यादी प्रकारचे अनेक कुशल कारागिर ह्या तज्ज्ञांत आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. १३ एप्रिल १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## परदेशी भांडवलवाल्यांची समजूत.

ब्रिटिश अंमलाच्या दिवसांत परदेशी सरकार आणि परदेशी भांडवलवाले ह्यांचें सहकार्य हिंदुस्थानच्या आर्थिक वाढीस बहुंशीं विघातक ठरलें होतें. परकी भांडवलाच्या व औद्योगिक ज्ञानाच्या साहाय्यानें येथें अनेक आधुनिक पद्धतींचे धंदे निघाले हें खरें. ह्या धंद्यांच्या अनुकरणानें कांहीं हिंदी धंदेही स्थापन झाले. परंतु सरकार व परकी धंदेवाले ह्या दोहोंचेंही धोरण इंग्लंडच्या हितास पोषक होईल अशा तऱ्हेनेंच हिंदुस्थानांतील धंद्यांची आंखणी करण्यांत असल्यानें देशाच्या सर्वांगीण व जोमदार वाढीस त्यांचा पूर्ण पाठिंबा मिळत नव्हता. स्वराज्यस्थापनेस विरोध करणारांमध्यें परकी भांडवलवाले अग्रेसर असल्यानें त्यांजबद्दल लोकमत प्रतिकूल बनलें होतें, व देशाची आर्थिक वाढ झाली नाहीं तरी चालेल, पण परकी भांडवलवाला नको अशीच सर्वत्र भावना होती.

स्वतंत्र हिंदुस्थानांत आतां परकीय संबंधांबद्दल पूर्वग्रहविरहित दृष्टीनें विचार करणें शक्य व आवश्यक झालें आहे. राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक ह्या सर्व क्षेत्रांत जगांतील लहान–थोर सर्व राष्ट्रांस परस्पर सहकार्यानें वागणें फायद्याचें ठरत आहे. शेतकी, वहातुक आणि कारखाने ह्या सर्वांच्या वाढीस लागणारें भांडवल, म्हणजे भांडवली जिन्नस व साधनें, आपल्या देशांत तयार होईपर्यंत थांबावयाचें म्हटलें तर आर्थिक प्रगतीचा वेग फारच मंद होईल, आणि देशाचें दारिद्र्य व परावलंबन चिरकाल टिकेल. दारिद्र्याच्या आणि एकलकोंडेपणाच्या परावलंबनापेक्षां परस्पर सहकार्याचा मार्गच अधिक श्रेयस्कर होय. ह्या धोरणाचें आपल्या सरकारकडून आतां अवलंबन होत आहे तें योग्यच आहे, व त्याचाच एक भाग परकी भांडवलास योग्य सवलती देणें हा होय.

पंडित नेहरूंनीं ह्या विषयाबद्दल जें सरकारी धोरण जाहीर केलें आहे तें तत्त्वतः देशहितास पोषक असल्यानें सामान्य जनतेकडून त्याचें स्वागतच होईल. ह्या धोरणाचें मुख्य सूत्र असें आहे कीं, हिंदी धंद्यांना जो कायदा लागू आहे तोच कायदा परकी धंद्यांस लावला जाईल. त्यांच्याबद्दल पक्षपाताचें धोरण अवलंबिलें जाणार नाहीं. आपल्या सध्यांच्या औद्योगिक कायद्याचें धोरण असें आहे कीं, प्रत्येक धंद्यांत हिंदी भांडवल बहुंशानें असलें पाहिजे, त्यांच्या शासक मंडळांत आणि नोकरवर्गांत हिंदी लोकांची बहुसंख्या असली पाहिजे, नफ्याचा दर सरकार ठरवून देईल त्यापेक्षां अधिक असतां कामा नये व कामकरी वर्गाबद्दलचें त्यांचें धोरण न्यायाचें आणि प्रगमनशील असावें. सामाजिक आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें ह्या धोरणानुसार वेळोवेळीं जे कायदे होतील ते सर्व धंद्यांस लागू होणार असल्यानें परकी भांडवलवाला आला तरी त्याला आतां राष्ट्रविघातक मार्गानें जाणें सोपें नाहीं.

जे परकीय धंदे हल्लीं येथें अस्तित्वांत आहेत त्यांनाही वरील निर्बंध बहुंशानें लागू आहेत. त्यांचें राष्ट्रीयीकरण होणें आवश्यक वाटल्यास नव्या धोरणानें त्यांस बाध येत नाहीं. मात्र त्यांना मिळणारी भरपाई ही वाजवी असेल आणि ती परदेशी अदा करण्यास शक्य त्या सवलती दिल्या जातील एवढेंच आश्वासन देण्यांत आलें आहे व तें चोख व्यवहारास धरूनच आहे. आज औद्योगिक वाढीची देशास फार मोठी जरूर आहे. तिला लागणारें भांडवल केवळ स्थानिक भांडवलदारांकडून उभें होणार नाहीं. शिवाय, यंत्रसामुग्री व तंत्रविषयक ज्ञान हें केवळ येथील भांडवलानें पुरेसें मिळणार नाहीं. किंबहुना, परकी धंदेवाल्यांच्या सहकार्यानें येथील धंदेवाल्यांसही अधिक उत्साह प्राप्त होईल. अलीकडे निघालेल्या अनेक कारखान्यांच्या अनुभवारून ही गोष्ट सिद्ध होत आहे. सध्यां जागतिक बँक व इतर संस्था आणि परदेशी भांडवलवाले ह्यांकडून भांडवली साधनें मिळविण्याची सरकारची खटपट चालू आहे, तिला नेहरू–धोरणानें पाठिंबा मिळेल.

परदेशी भांडवलाच्या आयातीनें औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या इतर राष्ट्रांत जे कठिण प्रश्न उत्पन्न झाले ते येथें होणार नाहींत, अशी वेळींच खबरदारी घेतली पाहिजे. हिंदी भांडवल आणि हुकमत ह्यांच्या बलाधिक्याचें तत्त्व तर कोणत्याहि परिस्थितींत सोडतांच कामा नये. त्याचप्रमाणें हिंदी धंदेवाल्यांस परकी राष्ट्रांत कोणत्या सवलती मिळतात, त्यांवर त्या राष्ट्राच्या भांडवलवाल्यांस येथें कोणत्या सवलती मिळाव्या हें अवलंबून ठेवलें पाहिजे. तसेंच परकी भांडवलाची देशाच्या औद्योगिक प्रगतीस जरूर आहे ह्याचा अर्थ हव्या त्या धंद्यांत परकी भांडवलवाल्यांस घुसूं द्यावें असा नाहीं. परकी भांडवलाची आणि धंदेवाल्यांची प्रत्येक आयात राष्ट्रहिताच्या दृष्टीनें तपासली गेली पाहिजे. जी आयात जरूर, निदान निरपवाद, ठरेल ती नव्या समतेच्या आणि न्यायाच्या धोरणास ठरून व्हावी. परदेशी भांडवलाबद्दलचें आपलें धोरण असें चिकित्सक असणें जरूर आहे. नाहीं तर व्यापार आणि निशाण ह्यांचा ईस्ट इंडिया कंपनीनें केलेला उपक्रम निराळ्या स्वरूपांत पुन्हां डोकें वर काढील.

### ग्रेट ब्रिटनमधील " बड्या पांच " बँका

१९४८ मधील नफा ( लक्ष पौंड )

| बँक | १९४८ मधील डिव्हिडंड % | १९४५ नफा | १९४६ नफा | १९४७ नफा | १९४८ नफा |
|---|---|---|---|---|---|
| बार्कलेज | १४ | १७.४ | १६.८ | १६.४ | १८.८ |
| लॉइड्स | १२ | १६.३ | १५.८ | १६.४ | १६.७ |
| मिडलंड | १६ | २०.६ | १९.९ | २०.० | २०.३ |
| नॅशनल प्रॉ. | १५ | १३.६ | १३.३ | १३.५ | १३.८ |
| वेस्टमिन्स्टर | १८ | १४.१ | १३.७ | १३.९ | १४.३ |
| एकूण | ... | ८१.९ | ७९.४ | ८०.१ | ८३.९ |

१९४८ मधील नफ्यानें गांठलेला उच्चांक वरील तक्त्यांत स्पष्ट दिसत आहे. बार्कलेज बँकेचा नफा विशेष वाढला आहे, त्याचें कारण हिशेबाची बदललेली पद्धति हें होय. व्यवस्थेचा खर्च व इतर खर्च हीं वाढूनहि ठेवींत व कर्जांत वाढ झाल्यामुळें बँकांचा नफाहि वाढला.

## हिंदी बँकिंगचा आढावा

### १९४७ अखेरची तुलनात्मक माहिती

हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांतील बँकांच्या १९४७ मधील व्यवहाराची आकडेवार माहिती देणारें रिझर्व्ह बँकेचे पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांत शक्य तेथें हिंदी व पाकिस्तानी बँकांची माहिती स्वतंत्रपणें दिली आहे. शेड्यूल्ड, बिगर-शेड्यूल्ड व सहकारी बँकांच्या ताळेबंदांची तपशीलवार माहिती, प्रत्येक गांवांत असलेल्या बँकांची यादी, क्लिअरिंग हाउसेसच्या सभासदांची व उपसभासदांची नांवें, रंगीत ग्रफ व नकाशे, इत्यादींमुळें प्रस्तुत प्रकाशन केवळ उपयुक्तच नव्हे, तर आकर्षकहि झालें आहे आणि बँकिंगच्या व्यवसायाची एकत्रित माहिती समजण्यास त्यामुळें फार सोय झाली आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, ऑगस्ट १९४७ मधील फाळणीमुळें बँकिंगच्या धंद्यास धक्का बसला तरी सर्वसाधारणपणें बँकिंगच्या व्यवसायानें वर्षअखेर प्रगतीच दाखविली. फारशा नव्या बँकांची स्थापना झाली नाहीं. पांच बँका शेड्यूल्ड बँकांच्या यादींत गेल्या, तर दोन बँका शेड्यूलमधून बाहेर पडल्या म्हणजे, एकूण शेड्यूल्ड बँकांची संख्या ९६ ची ९९ झाली. बँक ऑफ भोपाळ ही पाकिस्तान शेड्यूल्ड बँक म्हणून पाकिस्तान सरकारनें जाहिर केली. हैद्राबाद स्टेट बँक हिंदी शेड्यूल्ड बँक बनली. एकूण १३ नव्या बँका स्थापन झाल्या.

**बँकिंगच्या प्रगतीचे तुलनात्मक आंकडे**

| | १९३९ | १९४५ | १९४६ | १९४७ |
|---|---|---|---|---|
| बँकांची संख्या | ६८३ | ७२२ | ६९१ | ७०३ |
| शाखांची संख्या | २,०५९(१९४०) | ५,७२६ | ५,८६३ | ५,८६५ |
| (लक्ष रुपये) | | | | |
| वसूल भांडवल व रिझर्व | २८,६५ | ६२,५८ | ६८,६० | ७२,०७ |
| ठेवी | २,०३,४६ | ९,१२,९२ | १०,०५,७९ | १०,३१,३६ |
| रोकड | ३०,०८ | १,८२,०५ | १,९१,६६ | १,९८,३१ |
| कर्जें, डिस्काउंट केलेलीं बिलें | १,२०,५० | ३,५१,८४ | ४,६४,२५ | ४,४२,४२ |
| इनव्हेस्टमेंट्स | ७९,७६ | ४,६५,१९ | ४,६८,५९ | ४,९४,९० |

खालील तक्त्यांत हिंदुस्थानांतील बँकांच्या शाखांची तुलनात्मक वर्गवारी दिली आहे:—

**कचेऱ्यांची संख्या**

| | १९३८ | १९४५ | १९४६ | १९४७ |
|---|---|---|---|---|
| १ इंपीरिअल बँक | ३५८ | ४२६ | ४४३ | ४३७ |
| २ एक्स्चेंज बँका | ९३ | ७७ | ७७ | ७९ |
| ३ इतर शेड्यूल्ड बँका | ६७७ | २,४५४ | २९६० | ३०२५ |
| एकूण—शेड्यूल्ड बँका | १,१२८ | २,९५७ | ३,४८० | ३,५४१ |
| ४ बिगर शेड्यूल्ड बँका | | २३८१ | २,४४१ | १९९१ |
| ५ लाख रुपयांवरील भांडवल-गंगाजळीच्या सहकारी बँका | | ५६९ | ५९४ | ६४८ |

शाखावाढीची प्रवृत्ति आतां कमी आली आहे.

**गेल्या दहा वर्षांत लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँका**

| वर्ष | बँकांची संख्या | त्यांचें वसूल भांडवल (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १९३८ | ७३ | २० |
| १९३९ | ९० | १० |
| १९४० | १०२ | १२ |
| १९४१ | ७७ | ११ |
| १९४२ | ४९ | १२ |
| १९४३ | ५१ | ६ |
| १९४४ | २३ | ५ |
| १९४५ | २६ | ४ |
| १९४६ | २८ | २६ |
| १९४७ | ३० | ८५ |

**१९४७ सालीं लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँका**

| प्रांत अथवा संस्थान | बँकांची संख्या | वसूल भांडवल (लक्ष रु.) |
|---|---|---|
| प. बंगाल | १३ | १८ |
| मद्रास | ३ | ५ |
| मुंबई | ३ | २८ |
| सरहद्दप्रांत | १ | १ |
| पूर्व पंजाब | २ | १ |
| त्रावणकोर | २ | — |
| म्हैसूर | ४ | १ |
| राजकोट | १ | ६ |
| ग्वाल्हेर | १ | २५ |

### हिंदुस्थानांतील दुग्धालयाचा व्यवसाय

हिंदुस्थानांतील दुधाच्या व डेअरीच्या व्यवसायासंबंधीं हिंद सरकारला शेतीच्या मालाच्या बाजारपेठांबद्दल सल्ला देणाऱ्या अधिकाऱ्यानें एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ह्या पुस्तिकेंतील कांहीं उद्बोधक माहिती पुढें दिली आहे.

हिंदमधील प्रत्येक माणसा गणिक दूध अगर त्याचे पदार्थ ह्यांचा सरासरी खप अवघा ५ औंस आहे. ह्या खपापैकीं निम्यापेक्षां कमी पदार्थ दुधाच्या स्वरूपांत घेतले जातात. एकूण ४५·३ कोटी मण दुधाच्या उत्पादनापैकीं सुमारें ३६ टक्के दूध त्याच स्वरूपांत खपतें. वाहतुकीचा अभाव, दूध टिकविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या प्रक्रियांची सोय नसणें, इत्यादि कारणांमुळें दुधापैकीं ४३ टक्के दुधाचें रूपांतर लहान लहान खेड्यांतील लोक तुपांत करतात. इंग्लंडमध्यें दर माणशीं दुधाचा सरासरी खप ४१ औंस आणि अमेरिकेंत ३६ औंस आहे. त्या देशांतून दूध टिकविण्याच्या अगर त्याचें अशा प्रकारानें रूपांतर करण्याच्या सोयी उपलब्ध आहेत. गेल्या पांच वर्षांत हिंद सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांनीं शहरांचा दुधाचा पुरवठा वाढविण्याच्या दृष्टीनें उत्पादकांच्या सहकारी संस्थांना उत्तेजन दिलें आहे. सध्या अशा सहकारी संस्था रोज सुमारें २,२०० मण दुधाचा व्यवहार करतात. तथापि अजून त्यांच्या व्याप्तींत पुष्कळच वाढ होणें आवश्यक आहे. शहरांतून जो दुधाचा पुरवठा केला जात असतो त्याला किंमत फार पडते; शिवाय शहरांतील दुभत्या गुरांचे तबेले अत्यंत गलिच्छ आणि आरोग्यदृष्ट्या हानिकारक परिस्थितींत असतात. दुधांत भेसळ तर इतकी असते कीं ग्राहक दुधाच्या निर्भेळपणाबद्दल पूर्ण उदासीन बनलेले आढळून येतात. वरील परिस्थिति लक्षांत घेतां सहकारी दुग्धालयें अधिक प्रमाणावर निघणें कसें जरूर आहे, तें दिसून येतें.

## कापडाच्या उत्पादनावरील जकात

( भा. म. का. )

यंदाच्या अंदाजपत्रकांत कापडावर उत्पादनावरील जकात बसविण्यांत आली. एके काळीं कापडावरील जकातीला जनतेचा तीव्र विरोध होता व त्या विरोधाचा परिणाम म्हणूनच १९२६ सालीं ही जकात रद्द करण्यांत आली. १८९६ पासून १९२६ पर्यंत कापडावर जकात लादण्याचा उद्देश विशेषतः एक प्रकारें देशांत मोठ्या प्रमाणांत आयात होणाऱ्या इंग्लिश कापडाला संरक्षण देणें हा होता. आतां परिस्थिति बदलली असल्यामुळें कापडावरील जकातीची तरफदारी करण्यांत येत आहे. तेव्हां ही जकात आजच्या परिस्थितींत कितपत न्याय्य किंवा आवश्यक ठरते याचा विचार केला पाहिजे.

कापडाचें अंतर्गत उत्पादन अद्याप वाढावयास पुष्कळ अवसर आहे. कच्च्या कापसासाठीहि अलिकडे आपणाला इतर देशांवर अवलंबून रहावें लागतें. तेव्हां ह्या परिस्थितींत उत्पादनावरील जकातीमुळें गिऱ्हाइकाला कापड अल्प प्रमाणांत तरी महाग पडणार. वस्तूंचे बाजारभाव कमी करणें हें सरकारचें धोरण आहेच. त्या दृष्टीनें ही जकात कितपत समर्थनीय ठरते याचा विचार केला पाहिजे. यापुढें कापडाची एकंदरच किंमत विक्री मालाच्या दृष्टीनें उतरली पाहिजे.

या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे निर्गतीच्या दृष्टीनेंहि कापडाचा विचार झाला पाहिजे. आफ्रिका व आशियांतील नवीन बाजारपेठा हिंदला काबीज करतां येण्यासारख्या आहेत. या दृष्टीनें विचार करतां आपल्या कापडाची किंमत शक्य तितकी कमी राखणें आवश्यक आहे.

कापडाच्या उत्पादनाच्या जागतिक परिस्थितीचाहि या ठिकाणीं विचार करणें इष्ट आहे. जपानचें अंतर्गत कापडाचें उत्पादन वाढत आहे व नुकत्याच जपानशीं करण्यांत आलेल्या पांच कॉमनवेल्थमधील देशांकडून, करारान्वयें जून १९४९ अखेरपर्यंत २६३/४ दशलक्ष डॉलर किंमतीचा माल हिंदुस्थानांत आयात व्हावयाचा आहे. या मालामध्यें यंत्रसामुग्री असली, तरी कापडहि मोठ्यां प्रमाणांत यावयाचें आहे अमेरिका व इंग्लंड येथीलहि कापडाचें उत्पादन वाढत्या प्रमाणांत आहे. हें कापड जागतिक बाजारपेठेवर लादलें जाणार हें उघड आहेच. खुद्द इंग्लंडची हिंद व पाकिस्तानमध्यें कापडाची आयात १९४८ सालीं पूर्वीच्या वर्षाच्या मानानें चौपटीनें वाढली. युरोपमधील बेल्जम, हॉलंड व लक्सेंबर्ग ह्या देशांनीं १९४८-४९ सालीं कापडाची निर्गत २५ टक्क्यांनीं वाढवावयाचें ठरविलें आहे.

ही सर्व जागतिक परिस्थिति लक्षांत घेतां हिंदनें आपला कापडाचा धंदा उत्पादन व किंमत या दृष्टीनें सुधारणें आवश्यक आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. तलम कापडावर लादण्यांत आलेली जकात, कदाचित निर्गतीवर परिणाम करणें संभवनीय आहे. ऑस्ट्रेलियासारख्या देशांतून आपणाला धान्याची आयात करावी लागते. या दृष्टीनें विचार करतां आस्ट्रेलियाची बाजारपेठ कापडाच्या निर्गतीच्या दृष्टीनें कांहीं वर्षें कायम ठेवणें आवश्यक आहे. तेव्हां उत्पादनावरील जकातींत वाढ, कापडाच्या किंमती वाढवील असें दिसतें. अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्यासाठी सरकारी खर्चांत काटकसर करणें हाच मार्ग त्यांतल्या त्यांत जास्त समाधानकारक दिसतो. त्या दृष्टीनें होणाऱ्या प्रयत्नाचा परिणाम पुढील वर्षीं तरी दिसेल अशी आशा आहे.

---

**माकडा विरुद्ध मोहीम**—पूर्व पंजाब सरकारनें माकडांचा व वनगाईंचा नाश करण्यासाठी खास पथकें उभारण्याचें ठरविलें आहे. पूर्व पंजाबच्या डोंगराळ भागांत हीं जनावरें पिकांचा फार नाश करतात. तरी सुद्धा तेथील स्थानिक शेतकरी धार्मिक समजुतीमुळें त्यांना मारीत नाहींत. त्यामुळें सरकारला वेगळीं पथकें उभारावीं लागत आहेत.

**कापडावरील नियंत्रणाविरुद्ध तक्रार**—अहमदाबाद गिरणी मालक संघाची वार्षिक सभा श्री. रमणलाल लल्लुभाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. देशांत आर्थिक स्थैर्य उत्पन्न करावयाचें असेल तर व्यापाराचे मामुली मार्ग आणि खुला बाजार ह्यांची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. कापडावर पुन्हा घालण्यांत आलेल्या निर्बंधामुळें कापडाच्या वाटपावरच नव्हे तर उत्पादनावरही प्रतिकूल परिणाम झाला आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**२,५०० खोटीं शिधापत्रकें**—बांतवा आणि कुटीयाना येथें सौराष्ट्र सरकारनें निर्वासितांसाठी छावण्या चालविल्या आहेत. ह्या छावण्यांची होम गार्डस्नीं झडती घेतली असतां त्यांना २,५०० खोटीं शिधापत्रकें सांपडलीं. छावण्यांतील १०,००० निर्वासितांना सौराष्ट्र सरकार फुकट शिधा पुरवीत आहे. खोटीं शिधापत्रकें सांपडल्यामुळें त्यावर घेण्यांत येणाऱ्या धान्याचा मासिक ७५,००० रुपये खर्च सौराष्ट्र सरकारला ह्यापुढें पडणार नाहीं असा अंदाज आहे.


## पैशांचा झरा.

ज्यांना भरपूर वेळ आहे किंवा ज्यांना थोडा का होईना वेळ देतां येईल अशा कर्तबगार, प्रामाणिक व मेहनती लोकांना मुख्य किंवा जोडधंदा म्हणून एजन्सी देणें आहे. सह्याद्रि विमा कंपनीनें, भक्कम आर्थिक परिस्थिति, निर्वेध विमापत्रें, किमान हप्ते, प्रेमाची वागणूक वगैरे वैशिष्ट्यांमुळें आयुष्याच्या विमा क्षेत्रांत मानाचें स्थान मिळविलें असून लोकप्रियताही संपादन केली आहे. तावडतोब एजन्सी घ्या व भरपूर विमा काम मिळवून भरपूर कमिशन कमवा. आजच एक कार्ड टाका. संपूर्ण माहिती पाठवूं.

कचेऱ्याः—मुंबई, पुणें, सोलापूर, कोल्हापूर, बेळगांव, सावंतवाडी, कारवार, हुबळी, मडगांव, म्हापसें, बडोदें, धुळें, उमरावती, नागपूर, वर्धा, चांदा, इंदूर, औरंगाबाद, वगैरे.

गो. ग. सौंदणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.
सह्याद्रि विमा कंपनी लि., नासिक.

बँकेचे अध्यक्ष म्हणाले :

### चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना

"हिंदुस्थानापुढें महान् आर्थिक प्रश्न उभे आहेत, ते शांतता व सुरक्षितता नांदल्याविना समाधानकारक रीतीनें सुटणें शक्य नाहीं. कांहीं प्रश्न (उदाहरणार्थ, सतत वाढणाऱ्या लोकसंख्येस पुरविण्यासाठी अन्नाचें उत्पादन वाढविणें) अत्यंत मूलग्राही आहेत. चलनवाढीच्या प्रवृत्तीस उत्पादन वाढींतील अपयशानें उत्तेजनच दिलें आहे. परराष्ट्रीय व्यापारांतील तफावत अन्नाच्या आयातीमुळें अगोदरच प्रतिकूल होती, ती ज्यास्तच काळजी-करण्याजोगी झाली आहे. इतके दिवस जो माल निर्गत करून हिंदुस्थान परराष्ट्रीय हुंडणावळ मिळवूं शकत होता, त्या मालाची किंमत वाढल्यामुळें परदेशिय गिऱ्हाइक दुसऱ्या बाजार पेठांच्या शोधांत आहे. करांचें मान बचतीस व औद्योगिक गुंतवणुकीस पोषक नाहीं. त्यामुळें नव्या उपक्रमांस स्थानिक भांडवल मिळणें कठीण जात आहे. परदेशी भांडवलास भरीव पायाच्या व सु-नियंत्रित राज्यकारभाराच्या दीर्घ अनुभवाची प्रचीति मिळाल्या-खेरीज तें आकर्षिलें जाणार नाहीं."

मि. व्हिन्सेंट आल्प ग्रॅथम

### मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया

आपल्या बहुतेक सर्व शाखांचा व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. परंतु, विक्रेत्यांची चलती संपत येत असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. लवकरच, व्यापाराचें मान कमी येण्याचा संभव दिसतो. आपला जेथें जेथें व्यवहार चालू आहे, तेथें तेथें कराचा बोजा वाढत आहे आणि व्यवस्था खर्चहि फुगत आहे. पूर्वेकडील प्रत्येक देशांत चलनवाढीची परिस्थिति आहे. राहणीचा खर्च एकसारखा वाढत चालला आहे आणि त्यास अनुसरून युरोपियन व स्थानिक नोकरांचें वेतन वाढविण्यास बराच खर्च येत आहे. पगार वाढविले तर कर गोळा करणाऱ्या सरकारचीच त्यामुळें भर होते; पगारदार नोकरास फारसा फायदा होत नाहीं, ही खरी अडचण आहे.

सर चार्लस इन्स

---

### कापडाच्या गिरण्या

पाकिस्तान आणि हिंदुस्थानांतील तौलनिक आकडे

| | हिंदी संघराज्य | पाकिस्तान |
|---|---|---|
| वसूल भांडवल (कोटी रुपये) | ७१·०२ | १·९२ |
| चात्या: म्यूल | ३,४२,४५६ | ५,२०० |
| रिंग | ९९,२३,३८५ | १,६२,०२४ |
| एकूण | १,०२,६५,८४१ | १,६७,२२४ |
| चालू चात्या | ९४,२९,१३८ | १,५१,०८९ |
| मागांची संख्या | १,९७,४६९ | ४,६०३ |
| चालू माग | १,८१,१५१ | ४,२०९ |
| खपलेला कापूस (७८४ पौंडाच्या गांठी) | २१,००,०८५ | ४१,४०२ |
| कामगार | ४,६६,४७७ | ९,६६८ |


नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
पॅलेस स्ट्रीट, सातारा
शाखा:—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

शेअर्स विकणें आहेत
कंपनीचें अधिकृत भांडवल ५ लाख रुपये असून, ५० चा एक, याप्रमाणें दहा हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.
१ ल्या वर्षी कंपनीने ३ टक्के डिव्हिडंड वाटला. तसेंच
ठेवी स्वीकारणें आहेत.
व्याज १ वर्षाच्या करारानें ४ टक्के
" २ वर्षांच्या " ४॥ टक्के
" ३ वर्षांच्या " ५ टक्के
लिहा:—डॅगो आयुर्वेदिक फार्मसी लि.
नातेंपुतें, (जि. सोलापूर)

## दी बँक ऑफ औंध लि.

ता. ३ अेप्रिल, १९४९ रोजीं भरलेल्या बँकेच्या भागीदारांच्या वार्षिक साधारण सभेंत चेअरमन श्री. माधवराव रामचंद्र जोशी, बी. ए., पेपर मर्चंट, ह्यांचें भाषण

### ठेवींत घट; कर्जमागणींत वाढ

१९४७ साल बँकेला बरेंच अडचणीचें गेलें पण त्याहीपेक्षां गेलें साल जास्तच जिकीरीचें गेलें ही गोष्ट बँकेच्या नफ्याच्या आंकड्यावरून आपण जाणली असेलच. १९४७ सालीं कर्जाचा व्यवहार आम्हीं चालूं ठेवूं शकलों, पण १९४८ सालांत जवळ जवळ ८ महिने आम्हांस नवीन कर्जे देण्याचें धोरण फारच आखडतें घ्यावें लागलें. याचें मुख्य कारण बँकेकडील ठेवींत झालेली घट हें होय. १९४६ अखेर आमचेकडे अेकूण ठेवी रु. १७,४१,००० होत्या त्या १९४७ अखेर रु. १३,९८,००० इतक्यापर्यंत कमी झाल्या व १९४८ अखेर रु. १२,२०,००० येथपर्यंत खाली आल्या. ह्यावरून दोन वर्षांत सुमारें रुपये सत्रापांच लाखांनीं ठेवी कमी झाल्या. सातारा येथें १९४६ च्या अखेरीस नवीन शाखा उघडल्यापासून रुपये अडीच लाखांच्या नवीन ठेवी येऊन ही घट आहे. म्हणजे पाहिल्या ठेवींत सुमारें आठ लाखांची घट आहे हें आपणांस दिसून येईल. याला अनेक कारणें आहेत. पैकीं मुख्य कारण, औंध संस्थान मुंबई प्रांतांत सामील झालें हें होय. याशिवाय गेल्या ५।७ वर्षांच्या लढाईचे काळांत जो जादा पैसा बँकांचेकडे येत होता तो कमी होऊं लागला हेंही एक कारण आहे. याशिवाय सरकार निरनिराळे कर बसवून ते वसूल होणेकरतां जे उपाय योजीत आहे त्याचाही परिणाम मुख्यत: व्यापारी वर्गावर झालेला दिसतो. हल्लीं व्यापाऱ्यांची प्रवृत्ति बँकेंत रक्कम टाकणेपेक्षां स्वत:जवळ पैसा राखून व्यापार करणेकडे जास्त दिसून येते. निरनिराळ्या नियंत्रणांमुळें मालांतही बराचसा पैसा गुंतून रहात असावा असें वाटतें. या मानानें कर्जाचे व्यवहारांत मात्र विशेष फरक झालेला नाहीं. उलट मागण्या मात्र जास्त येत आहेत व यामुळेंच नवीन कर्जे देणेचें धोरण आखडतें घ्यावें लागलें आहे.

### वसुली

औंध संस्थानांतील सहकारी सोसायट्यांकडे बँकेचें सुमारें अेक लाख पस्तीस हजार रुपये येणें असून या सोसायट्या आतां संस्थानांतील गांवांच्या नवीन व्यवस्थेप्रमाणें सहकारी बँकांकडे जातील. ही गांवांची व्यवस्था सरकारकडून अद्यापि निश्चित न झालेमुळें ही रक्कम अडकून पडली आहे. त्याचप्रमाणें संस्थान सामील होणेपूर्वी औंध संस्थानला दिलेल्या कर्जापैकीं अद्यापि सत्तर हजार रुपयांचेवर येणें आहे. यापैकीं रुपये १२०००।- चा हप्ता ता.१-४-४८ रोजीं येणें होऊनही तो अद्यापि वसुलांत आला नाहीं. ता. १-४-४९ ला या कर्जापैकीं सुमारें रुपये पस्तीस हजार व्याजासुद्धां येणें झालें असून ही रक्कम लवकर मिळावी अशाबद्दल मुंबई सरकारबरोबर पत्रव्यवहार चालूं आहे.

बँकेच्या शाखांपैकीं औंध व भवानीनगर या शाखांत कर्जाचा व्यवहार जवळ जवळ नाहीं म्हटलें तरी चालेल. परंतु तेथील ठेवीकरतां खर्च करूनही त्या शाखा चालूं ठेवणें भाग पडत आहे. थोड्याशां खेळत्या भांडवलांत चार शाखा व एक हेडऑफिस अशा पांच ठिकाणचा खर्च चालविण्याचें भाग पडत असल्यामुळें याचा परिणाम नफ्यावर झाल्याचें दिसून येईल.

### नवा बँकिंगचा कायदा

बँकांबाबत नुकताच नवीन कायदा अमलांत आला असून त्यांतील बंधनांना अनुसरून बँकांना व्यवहार चालवावा लागत असलेमुळें, आहे हा कर्जाचा व्यवहार आणखी आखडता घ्यावा लागणार आहे. नवीन कायद्याप्रमाणें एकाच माणसाला दोन बँकांचे डायरेक्टर होतां येत नाहीं, त्यामुळें पुढील सहा महिन्यांत आपले डायरेक्टर्समध्यें बराच फेरबदल झालेला दिसेल.

### नफा व डिव्हिडंड वाटणी

बँकेच्या नफातोटा पत्रकावरून नफा काढणेपूर्वी संशयित कर्जे रुपये पांच हजार तेराचीं कमी करणेंत आलीं. त्याचप्रमाणें नोकरांना बोनस देणेसाठी रु. २,३६४ ची तरतूद करणेंत आली आहे. यावरून बँकेचा नफा सुमारें रु. ७,७०० इतपर्यंत कमी झाल्याचें आपणांस दिसून येईल. साल अखेरीनंतर १९४७ सालच्या भरलेल्या इन्कमटॅक्सपैकीं रुपये ३,०१९ इतका रिफंड आला असून त्याशिवाय १९४८ सालीं भरलेल्या इन्कमटॅक्स पैकीं सुमारें रु. ४,५०० रिफंड येईल असा अंदाज आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच डिव्हिडंड एक्विलायझेशन् फंडांतून डिव्हिडंड करतां रक्कम काढून डिव्हिडंड वाटावें अशी बोर्डानें शिफारस केली आहे. याही डिव्हिडंड वाटणीस नवीन कायद्याच्या कलम १५ प्रमाणें अडचण येते कीं काय अशी शंका उत्पन्न झाली आहे. कारण बँकेच्या ताळेबंदांत विमाखात्यांतील तोटा म्हणून रु. ९९९६-९-८ इतकें जिंदगीचें बाजूस दाखविलें असून त्याशिवाय बँकेच्या इन्व्हेस्टमेंटसची किंमतही सुमारें दहा हजारांनीं कमी झाल्याचें दिसून येतें. या दोन्हीं रकमा प्रत्यक्ष सोसण्याची वेळ आलेस त्या करतां बँकेच्या कॉन्टिन्जन्सी व इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंडांत भरपूर तरतूद असल्यानें वरील कलमाचा बाध येणार नाहीं असें वाटतें. तरीपण सदर बाबतींत रिझर्व्ह बँकेकडे लिहून त्यांचेकडून परवानगी आलेस जाहीर होत असलेलें डिव्हिडंड वाटणेंत येईल.

### आश्वासन

वर निर्दिष्ट केलेल्या अडचणींतून कसा मार्ग काढावा याबाबत विचारविनिमय चालू आहे व त्याबाबतची निश्चित योजना झालेनंतर बँकेला तिच्या गिऱ्हाइकांची जास्त चांगले रीतीनें सेवा करतां येईल अशी डायरेक्टरांना उमेद आहे.

---

## गुमास्ता कायद्याची अंमलबजावणी

### अडचणी समजून घेण्याचा सरकारचा प्रयत्न

गुमास्ता कायद्याच्या ४ थ्या व ५ व्या कलमानें, ह्या कायद्याच्या किंवा त्यांतील कांहीं भागांचा अंमल तात्पुरता स्थगित करण्याचा अधिकार सरकारास दिला आहे. व्यवसायिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी त्याचा कसा व किती फायदा घेता येईल, ह्याचा सरकार विचार करीत आहे. सरकारनें मुंबई व अहमदाबाद येथें ह्यासाठी अनुक्रमें ता. २३ व २५ एप्रिल रोजीं परिषदा ठरविल्या आहेत आणि १ मे पर्यंत कायद्याची अंमलबजावणी कठोरतेनें करूं नये अशीं म्युनिसिपॅलिट्यांना विनंति केली आहे. ज्यांना विशेष मतें किंवा अडचणी कळविणें असेल, त्यांनीं १८ एप्रिलपूर्वी सरकारास लिहावें.

---

**रात्रीचा विमानप्रवास**—दिल्ली, मुंबई, मद्रास आणि नागपूर ह्या शहरांच्या दरम्यान रात्रीं विमान प्रवास करण्याची परवानगी हिंद सरकार इंडिअन ओव्हरसीज एअर लाइन्स लि. ह्या कंपनीला देणार आहे, असें समजतें.

## विमा उतरविलेल्या कापूस-गांठी जळाल्या.

### नुकसान भरपाईचा दावा मुदतीबाहेर.

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा

पश्चिम खानदेशांतील शिरपूर गांवच्या मेसर्स दीपचंद रूपचंद ॲन्ड सन्स ह्या पेढीनें एका एजंटामार्फत सेन्टिनल ॲश्युअरन्स कंपनी लिमिटेड ह्या विमा कंपनीकडे आपल्या ११५ कापूस गांठींचा २५,००० रुपयांचा विमा १७-नोव्हेंबर १९४७ रोजीं उतरविला. विमा कंपन्यांचे एजंट गांवोगांव असतात व त्यांना विमे उतरविण्याचा अधिकार असतो. कंपनीच्या मुख्य कचेरीकडून विमा पॉलिसी तयार होऊन येईपर्यंतच्या काळासाठीं हें एजंट तात्पुरतीं संरक्षण पत्रें (कव्हर नोटस) देत असतात. तसें पत्र वरील पेढीसहि एजंटानें दिलें होतें. अशा स्थितींत लगोलग दुसऱ्याच दिवशीं आग लागून तींत वरील कापूस गांठीहि जळाल्या व एजंटानें दिलेल्या संरक्षण पत्रावरून पेढी विम्याचे पैसे मागूं लागली. तेव्हां कंपनीतर्फे दोन मुद्दे पुढें करण्यांत आले: एजंटांनीं दिलेल्या तात्पुरत्या संरक्षण पत्रांना प्रत्यक्ष विमा-पॉलिसींतलि सर्व शर्ती लागूं असतात, व म्हणून विमा पॉलिसींतील शर्तीप्रमाणें कंपनीनें विमा-रक्कम देण्याचें नाकारल्यापासून तीन महिन्यांच्या आंत दावा दाखल केला पाहिजे. पेढीला कंपनीचें हें म्हणणें मान्य नव्हतें; व पेढीचा दावा सुमारे एक वर्षानंतर दाखल करण्यांत आलेला होता. आपल्या निकालांत मुंबई हायकोर्टानें कंपनीचेंच म्हणणें ग्राह्य धरलें. तात्पुरत्या संरक्षण पत्रास प्रत्यक्ष विमा-पॉलिसीच्या सर्व शर्ती लागूं असतात; म्हणून विमा-रक्कम देण्याचें कंपनीनें नाकारल्यास विमा-पॉलिसींतील शर्तीनुसार तीन महिन्यांचे आंत दावा दाखल करावयास हवा होता, असें मत नमूद करून सुमारें एक वर्षानंतर दाखल केलेला पेढीचा दावा हायकोर्टानें मुदतीबाहेर धरून रद्द केला.

—×—

### प्राप्तीवरील कराचें खातें

ह्या खात्यांत ११ कमिशनर्स, ७२ असिस्टंट कमिशनर्स आणि ६९५ इन्कमटॅक्स ऑफिसर्स असावेत अशी मंजुरी आहे. गेल्या कांहीं वर्षांत ह्या खात्यांतून चांगल्या शिक्षित माणसांची वाण भासत आहे. ह्या खात्याचें काम युद्धकालांत फार वाढलें. सध्याप्रमाणेंच ह्या कराची आकारणी होत राहिल्यास काम कमी होण्याचा संभव नाहीं. ह्याशिवाय मालमत्तेवरील कराचें बिल, इन्कमटॅक्स कमिशनच्या शिफारसी आणि संस्थानांचें विलीनीकरण, इत्यादि नवीन बाबींमुळें कामांत वाढ होण्याचा संभव आहे. म्हणून १९४६ पासून १ ल्या व २ ऱ्या वर्गाच्या जागांसाठीं भरती चालू आहे. गेल्या कांहीं महिन्यांत १ ल्या वर्गांतील जागांसाठीं २१८ माणसें निवडण्यांत आलीं. त्यापैकीं १६१ लोक २ ऱ्या वर्गांतून घेण्यांत आले. बाकीचे नौकर परीक्षा घेऊन निवडण्यांत आले. त्याशिवाय फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या द्वारां १५३ इन्कमटॅक्स ऑफिसर्स घेण्यांत आले.

### कराची तात्पुरती आकारणी

प्राप्तीवरील कराची थकलेली बाकी वसूल करण्यासाठीं आणि चलनवृद्धिविरोधी धोरणाचा एक भाग म्हणून, करास पात्र असलेल्यांच्याकडून जी माहिती आली असेल तिच्या आधारानें कराची तात्पुरती आकारणी करतां यावी ह्या हेतूनें डिसेंबर १९४८ मध्यें एक वटहुकूम काढण्यांत आला. ही तात्पुरत्या आकारणीची पद्धत प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासाठीं एक बिल मध्यवर्ती कायदेमंडळांत मांडण्यांत येणार आहे.







'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B (वकील) (अध्यक्ष) ‖ श्री. बी. बी. वाळवेकर (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४२,८१०.
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. आ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.